| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | **विभागीय शिक्षण उपसंचालक,**<br>पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,<br>**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१** | w'site : www.dydepune.com<br>e-mail : dydpune@gmail.com<br>Phone : (020) 26122217 |

जा.क्र.शिउसं/पूवि/उमा-४०१/संकीर्ण/२०२१/ ०२४४      दि.०१/०७/२०२२

परिपत्रक

0 5 JUL 2022

प्रति,

**मुख्याध्यापक/ प्राचार्य**

उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालय (सर्व)

पुणे, अहमदनगर व सोलापूर जिल्हा

**विषय:- महाज्योती मार्फत इमाव, विजा, भज व विमाप्र गटातील विद्यार्थ्यांसाठी MHT-CET/JEE/NEET परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी मोफत Online प्रशिक्षणाबाबत**

**संदर्भ:-**इतर मागास वर्ग व बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई (महाज्योती) यांचे पत्र क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/१९५/२०२२-२३, दि.२७/०५/२०२२

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्र सोबत जोडलेले असून त्यानुसार इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या स्तरावरून विद्यार्थ्यांना सूचना देऊन दिलेल्या संकेत स्थळावर नोंदणी करण्याबाबत कळवावे.

**सोबत:-** संदर्भ पत्र जोडलेले आहे.

**(औदुंबर उकिरडे )**
विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर**

मा. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर

**प्रत:- माहितीस्तव तथा आपल्या स्तरावरून सर्व कानिउस्थ महाविद्यालयांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्यासाठी**

शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, पुणे, अहमदनगर, सोलापूर

महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

# महाराष्ट्र शासन
## इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती, नागपूर/ आस्था/195 /2022-23, दिनांक :- 27/05/2022

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
03 JUN 2022
C2C2
आवक नोंदवही क्रमांक

प्रति,
मा. उपसंचालक,
शिक्षण,
नागपूर, अमरावती, पुणे, नाशिक, औरंगाबाद, कोकण, विभाग.

विषय:- महाज्योती तर्फे इमाव, विजाभज व विमाप्र गटातील विद्यार्थ्यांसाठी MHT-CET/JEE/NEET परीक्षांच्या पुर्वतयारीसाठी मोफत ऑनलाईन प्रशिक्षणाबाबत.

महोदय,

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योती, नागपूर ही राज्य शासनाच्या इमाव, विजाभज व विमाप्र विभागाची स्वायत्त संस्था आहे. या संस्थेकडुन इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना /उमेदवारांना MHT-CET/JEE/NEET, MPSC, UPSC परीक्षांसाठी मोफत ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येत आहे.

वरील पैकी MHT-CET/JEE/NEET, MPSC, UPSC च्या चालु वर्षात होणाऱ्या परीक्षांसाठी महाज्योतीकडे लक्ष्य गटातील 2850 व पुढील वर्षी म्हणजेच सन 2023 मध्ये होणाऱ्या परीक्षांसाठी 8900 विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. सदर विद्यार्थ्यांना महाज्योती, नागपूर येथील मुख्यालयात स्थापित अत्युच्च दर्ज्याचे डिजीटल क्लासरुम च्या माध्यमातुन उच्चशिक्षित व 20 ते 30 वर्षाचा दीर्घ अनुभव असलेल्या प्रशिक्षकांमार्फत ऑनलाईन प्रशिक्षण देणे सुरू आहे. या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रशिक्षण घेणे सोईचे व्हावे यासाठी उच्च प्रतीचे टॅबलेट पीसी व दैनंदिन 6 GB इंटरनेट डाटा मोफत पुरविण्यात आले आहेत. या सर्व सुविधांचा लाभ विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणावर होत आहे.

वरील प्रमाणेच सन 2024 मध्ये होणाऱ्या MHT-CET/JEE/NEET च्या परीक्षांच्या ऑनलाईन प्रशिक्षणासाठी चालु शैक्षणिक सत्रात इयत्ता 10 वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या व इयत्ता 11 वी मध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या लक्ष्य गटातील नॉन क्रिमीलेअर खाली येणाऱ्या विद्यार्थ्यांकडुन दि. 01, मे 2022 पासुन www.mahajyoti.org.com या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

**या प्रकल्पाची ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.**

1. अंदाजे 15000 विद्यार्थ्यांची नोंदणी अपेक्षित
2. उच्चशिक्षित व दीर्घ अनुभवी प्रशिक्षकांमार्फत मोफत ऑनलाईन प्रशिक्षण
3. मोफत उच्च प्रतीचा टॅबलेट पीसी
4. मोफत दैनंदिन 6 GB इंटरनेट डाटा
5. ऑनलाईन प्रशिक्षणासाठीच्या टॅबलेट मध्ये महाज्योती संस्थेने तयार केलेले ॲप्लीकेशन
6. ऑनलाईन प्रशिक्षणासोबतच प्रशिक्षणाचे व्हिडीओ साठवुन आवश्यकतेनुसार केव्हाही अभ्यासण्याची सुविधा
7. Question Bank (Solution सहीत)
8. प्रशिक्षकांकडुन / डिजीटल प्लॅटफॉर्म द्वारे Doubt Session ची सुविधा
9. प्रत्येक विषयाचे प्रकरण निहाय प्रश्नोत्तर व अन्य माहिती असलेले मॉडयुल्स / अभ्यास साहित्य

महाज्योती या संस्थेच्या उद्दिष्टांनुसार लक्ष्यगटातील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा या दृष्टीने सर्व माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांपर्यत या योजनेचा प्रसार होणे आवश्यक वाटते. तरी आपले स्तरावरुन सर्व शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, ई. यांना योग्य त्या सुचना देऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची www.mahajyoti.org.com या संकेतस्थळावरील नोंदणी होण्यास कृपया सहकार्य करावे.

सहपत्र : योजनेचा तपशील

व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रतिलिपी,

मा. सचिव (शिक्षण) मंत्रालय, मुंबई, यांना माहितीस्तव सादर.

व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

## महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) मार्फत राज्यातील इतर मागासवर्गीय, भटक्या जाती-विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना मोफत ऑनलाईन प्रशिक्षण MHT-CET/JEE/NEET 2024 करीता

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय, भटक्या जाती-विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना MHT-CET/JEE/NEET 2024 करीता पुर्व प्रशिक्षण या योजने अंतर्गत अर्ज मागविण्यात येत आहे.

MHT-CET/JEE/NEET 2024 मध्ये होणाऱ्या परीक्षांकरीता इतर मागासवर्गीय भटक्या जाती-विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना MHT-CET/JEE/NEET 2024 चे पुर्व प्रशिक्षण महाज्योती मार्फत देण्यात येईल. MHT-CET/JEE/NEET 2024 चे प्रशिक्षण 15 जुलै पासुन सुरु करण्यात येईल.तसेच प्रशिक्षणासोबत पुस्तके व इतर साहित्य पुरविण्यात येईल.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता :**

1. उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
2. इतर मागासवर्गीय, भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्ग यापैकी असावा/असावी.
3. उमेदवार नॉन - क्रिमिलेअर उत्पन्न गटातील असावा/असावी.
4. ज्या उमेदवारांनी 2022 मध्ये 10 वी परिक्षा दिलेली आहे उमेदवार अर्ज भरण्यास पात्र आहे.अश्या उमेदवारांनी अर्ज करताना 10 वी परिक्षा प्रवेश पत्र जोडून अर्ज करावा.
5. क्र.4 प्रमाणे अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी 65% व त्यापेक्षा अधिक गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांनी सादर ऑनलाईन करावयाच्या गुणपत्रकाच्या आधारे व एकूण क्षतमेच्या मर्यादेत अंतीम निवड यादीत समावेश केला जाईल.

**अर्ज कसा करावा ?**

1. महाज्योती च्या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **Application for MHT-CET/JEE/NEET 2024** यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत जातीचा दाखला, दहावी परीक्षा प्रवेशपत्र,अधिवास प्रमाणपत्र(Domicile Certificate), नॉन - क्रिमिलेअर, आधार कार्ड ही कागदपत्रे स्व-साक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावी.
3. अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक 31, मे 2022 असेल. ऑफलाईन किंवा ई-मेल द्वारे प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.
4. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांच्या अखत्यारीत असतील.
5. अर्जाचा नमुना व अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक : 07122870120
6. ई-मेल आयडी : mahajyotijeeneet24@gmail.com

**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(महाज्योती), नागपूर**

E:\Desktop data for mahajyoti\Kove\mahajyoti classroom Iqupments\MPSC UPSC Bill and all data\MPSC,UPSC,NEET 23-24\MHT-CE JEE NEET 2024.docx